

<u>गोष्ट एका चिमणी आणि डोंगराची</u>

खूप पूर्वीची गोष्ट आहे एका वाळवंटात एक मोठा खडकाळ डोंगर होता. त्या डोंगरावर काहीच उगवत नसे म्हणून त्या डोंगरावर कुठलेच जनावर, पक्षी, किडे येत नसत. सूर्याच्या उष्णतेने बिचारा डोंगर तपायचा आणि रात्र झाली कि थंडी मुळे कापायचा. पावसाळ्यात धो धो पाऊस यायचा पण सगळं पाणी वाहून जायच. हिवाळ्यात मात्र बर्फा मुळे तो बिचारा गोठून जायचा. रात्रं दिवस तो डोंगर बिचारा आकाशा कडे टक लावून बघत बसायचा. त्याला दिवसा सूर्याची आणि रात्री चंद्राची वाटचाल अगदी पाठ झाली होती. रात्री च्या वेळी चंद्राच्या मंद प्रकाशात तो आकाशातले तारे मोजत बसायचा.

एके दिवशी त्या डोंगरावर एक छोटीशी चिमणी आली. डोंगरावर भिर भिर फिरल्यावर विश्रांती साठी डोंगरावर येऊन बसली. चिमणीचे इवले इवले पाय व कोमल पंखांच्या स्पर्शाने डोंगर अति आनंदी झाला. आज पर्यंत डोंगराला असा अनुभव कधीच आला नव्हता. त्याने चिमणीला विचारलं कोण ग तू ? काय तुझा नाव ?

चिमणी म्हणाली... मी चिमणी आणि माझा नाव ख़ुशी ... मी एका खूप लांब देशातून आले आहे जिथे सगळी कडे हिरवळ पसरली आहे. दार वर्षी वसंत ऋतू आला कि मी उंच उंच उडून आपल्या साठी एक जागा निवडते, तिथे एक घरटं बांधते, त्या घरात अंडी देते आणि माझ्या मुलांचा सांभाळ करते. अश्याच जागे च्या शोधात मी निघाले होते. मी दामले म्हणून तुझ्या जवळ येऊन बसले. आता मी परत माझ्या शोधात निघते.

डोंगर हे ऐकून फार दुखी झाला. तो म्हणाला नाही का ग तू माझ्या जवळ राहू शकणार? तू ला जाण जरुरीचं आहे का ? हे ऐकून चिमणी डोंगराला समजावत म्हणाली "अरे मी एक जिवंत प्राणी आहे म्हणून मला खायला अन्नआणि प्यायला पाणी लागत. तुझ्या कडे तर काहीच उगवत नाही, पाण्याचा झरा देखील नाही मग मी इथे कशी राहू?"

डोंगर म्हणाला " बर जातेस का जा पण येशील ना परत मला भेटायला ?"

ख़ुशी डोंगराला म्हणाली " अरे मी दर वर्षी डोंगरांवर विश्रांती घ्यायला बसते पण आज पर्यंत कुठल्याच डोंगरांनी मला परत भेटायला ये अस नाही म्हंटलं. मला तू खूप आवडला आहेस. मी नक्की तुला दर वर्षी भेटायला येईन. पण तुला माहित आहे का कि तू एक डोंगर आहेस आणि तू नेहमीच इथे असाच राहणार आहेस. पण मी एक जीव आहे म्हणून मी काहीच वर्ष जिवंत राहीन. मी जितकी वर्ष जिवंत आहे तितकी वर्ष तुझ्या कडे येत राहीन.

डोंगरांनी विचारले ' मग तुझ्या नंतर पुढे काय ? मला तुझ्हा गाणं मग कसा ऐकता येईल?

त्यावर चिमणी म्हणाली कि तू काळजी नको करू. मी माझ्या एका मुलीचे नाव खुशीचा ठेवेन. माझ्या नंतर ती दर वर्षी तुझ्या कडे येईल आणि तुला ती पण गोडगोड गाणी ऐकवेल. असं म्हणून चिमणी ख़ुशी आपल्या पुढच्या प्रवासाला निघाली. डोंगर टक लावून तिच्या कडे बघत बसला.

आता दर वर्षी एक ख़ुशी यायची डोंगराशी गप्पा मारायची, गाणी म्हणायची आणि निघून जायची. डोंगराला आता चिमणीची सवय झाली होती. त्याला आता असे वाटू लागले कि हि आपल्या कडे नेहमी साठीच का नाही राहून जात. म्हणून यंदा चिमणी जेव्हा जायला निघाली तेव्हा डोंगराचा जीव अगदी कासावीस झाला आणि त्याला रडू आले. त्याच्या अश्रूंनी डोंगरावर दगडानं मधून एक पाण्याचा झराच तयार झाला. चिमणीला

डोंगरावर पाण्याचा झरा बघून एक शक्कल सुचली. ती पुढच्या वर्षी येताना आपल्या चोचीत एक झाडाचे बीज घेऊन आली.

तिने हळूच ते बीज झऱ्याच्या बाजूला दोन दगडांच्या मध्ये दाबून ढेवलं. मग डोंगराला एक छानस गाण ऐकवून तीन डोंगराचा निरोप घेतला. गम्मत अशी झाली कि दोन आठवड्या नंतर त्या बीजात छोटस कोंब फुटल आणि खाली मूळ सुद्धा अली. कालांतराने त्या बिजेच एक मोठं झाड झालं. त्या झाडाची मुळे हळू हळू दगड फोडून पसरू लागली. आता दर वसंत ऋतूत ख़ुशी आपल्या बरोबर एक बीजघेऊन यायची आणि त्या डोंगरावर दगडांच्या मध्ये दाबून निघून जायची.

बघता डोंगरातले खडतर दगड मूळ वाढत असल्या मुळे सैल पडू लागले. काहीच वर्षात त्या डोंगरावर झाडे आणि त्याला फुले आलीत. त्याच बरोबर वाऱ्या बरोबर आता किडे फुल पाखरू तिथे येऊ लागले.

आता डोंगरावर पडणाऱ्या पाऊसाचे पाणी तिथल्या खोल जाणाऱ्या झाडाच्या मुळान मध्ये मुरू लागले.

आता पावसाच्या पाण्या मुळे डोंगरावरच्या छोट्याश्या झऱ्याची नदी झाली.

आता डोंगर आधी सारखा एकटा आणि ओसाड राहिला नव्हता. आता तिथे फुले हिरवीगार झाड, फुलपाखरू किडे हे सगळे तिथे राहू लागले. डोंगराचा एकटे पण आता संपू लागला. डोंगर आता खुश होता.

ह्या वर्षी वसंत ऋतुत जेव्हा ख़ुशी आली तेव्हा डोंगरावरची हिरवळ बघून तिला खूप आनंद झाला. ती डोंगराला म्हणाली कि आता मी इथेच राहायला येणार आणि ह्या सगळ्यात मोठ्या झाडावर आपले घरटे बांधणार.

तर मुलांनो अशी होती एका निर्जीव डोंगराची आणि छोट्याश्या चिमणीच्या मैत्रीची कथा.

